मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी मागासवर्गीयांच्या आरक्षणासंदर्भात दिलेल्या निर्णयाविरुध्द मा. सर्वोच्च न्यायालयात अपिल दाखल करणे व त्यानुषंगाने लिगल फर्म व विशेष समुपदेशी (Senior Counsel) ची नियुक्ती करुन त्यांची फी मंजूर करुन अदा करणे.

महाराष्ट्र शासन

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

शासन निर्णय क्रमांक :- सीबीसी-२०१७/प्र.क्र.२०३/मावक

हुतात्मा राजगुरु चौक,मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक : २४ मे,२०१८.

<u>संदर्भ</u> : १) विधी व न्याय विभागाचे पत्र क्र.१००२-२०१७/E,दि.१८.१०.२०१७

<u>प्रस्तावना</u> -

राज्य शासनाने महाराष्ट्र राज्य लोकसेवा (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती),भटक्या जमाती,विशेष मागासप्रवर्ग आणि इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण) अधिनियम,२००१ हा कायदा २००४ पासून लागू केला आहे. त्यामधील पदोन्नतीच्या तरतुदींना श्री.विजय घोगरे व इतर यांनी संलग्न याचिकांव्दारे उच्च न्यायालय, मुंबई येथे आव्हान दिले होते. त्यामध्ये मा.उच्च न्यायालय,मुंबई यांनी रिट याचिका क्र.२७९७/२०१५ व इतर संलग्न प्रकरणी दि.२१.१२.२०१६, २५.०७.२०१७ व दि.०४.०८.२०१७ रोजी दिलेल्या आदेशाविरुध्द मा.सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका दाखल करण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे.

या विशेष अनुमती याचिका प्रकरणी राज्य शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या वतीने ज्येष्ठ विधीतज्ञ ॲड.श्री.गुरुकृष्णकुमार यांची विशेष समुपदेशी म्हणून नियुक्ती करण्यास संदर्भाधिन पत्र दि.१८.१०.२०१७ विधी व न्याय विभागाने मान्यता दिलेली आहे. त्यानुसार संबंधित ज्येष्ठ विधीतज्ञ ॲड.श्री.गुरुकृष्णकुमार यांच्या शुल्क संरचनेस मान्यता देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

<u>शासन निर्णय :-</u>

राज्य शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुमती याचिका प्रकरणी ज्येष्ठ विधीतज्ञ ॲड.श्री.गुरुकृष्णकुमार विशेष समुपदेशी यांच्या खालीलप्रमाणे शुल्क आकारणी करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

Sr.No.	Items	Amount in lakh
1	Retainer	Rs.10.00
2	For Appearance before the Supreme Court (per hearing) Miscellaneous hearings Final Hearings	 Rs.5.50 Rs.7.70
3	For vetting/setting of SLP, Rejoinder etc.	Rs.3.30
4	For vetting/setting of IAs, Affidavit etc.	Rs.1.65
5	The above appearance fee would include a conference for one hour per hearing and further conference would be charge at Rs.25000 per hour.	As per necessary requirement

२. ज्येष्ठ विधीतज्ज्ञ ॲड.श्री.गुरुकृष्णकुमार विशेष समुपदेशी यांनी उपरोक्त याचिकेच्या अनुषंगाने सादर केलेल्या कामकाजाची देयके महासंचालक,डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था,पुणे यांनी छाननी करुन कार्यपूर्तीच्या अनुषंगाने महासंचालक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था,पुणे यांना सन २०१८-१९ करिता उपलब्ध केलेल्या निधीमधून लेखाशिर्ष २२२५-३६८-१ (३१) सहायक अनुदाने (वेतनेत्तर) यामधून प्रदान करावीत. सदर प्रदाने करतांना वित्त विभाग,शासन निर्णय क्रमांक विअप्र २०१५/प्र.क्र.२१/२०१५/विनियम, दि.२९.०७.२०१५ मधील विहीत अटींचे पालन करण्यात यावे.

३. सदर शासन निर्णय वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक विअप्र २०१५/ प्र.क्र.२१/ २०१५/ विनियम, दि.२९.०७.२०१५ अन्वये वित्तीय अधिकार नियमपुस्तिका,१९७८ भाग-पहिला, उपविभाग दोन मधील अ.क्र.४९ नियम क्र.१६६-अ च्या अनुषंगाने व विधी व न्याय विभागाच्या पत्र क्रमांक १००२-२०१७/E, दि.१८.१०.२०१७ अन्वये ज्येष्ठ विधीतज्ज्ञ ॲड.श्री.गुरुकृष्णकुमार यांच्या नियुक्तीस दिलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. २०१८०५२४१७३३२६५४२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

Dinesh Ramchandra Dingle

Digitally signed by Dinesh Ramchandra Dingle
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justice And Special Assistance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8612f2011cf8cde3b074d561cd711c17c6c3fd836467a8648a8d21dc84bc01be, cn=Dinesh Ramchandra Dingle
Date: 2018.05.24 17:31:30 +05'30'

(दि.रा.डिंगळे)

सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेय/लेखापरिक्षा) महाराष्ट्र१/२,मुंबई/नागपूर

२) अपर मुख्य सचिव (वित्त),वित्त विभाग,मंत्रालय,मुंबई

३) प्रधान सचिव,विधी व न्याय विभाग,मंत्रालय,मुंबई

४) सचिव,का-१६ब,सामान्य प्रशासन विभाग,मंत्रालय,मुंबई

५) आयुक्त,समाजकल्याण,महाराष्ट्र राज्य,पुणे

६) महासंचालक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था,पुणे

७) मा.मंत्री,सामाजिक न्याय यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई

८) मा.राज्यमंत्री,सामाजिक न्याय यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई

९) सचिव,सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई

१०) अधिदान व लेखाधिकारी,मुंबई

११) मे.एस.के.लिगल असोसिएटस्, २०१-बी, एम.बी.हाऊस,दुसरा मजला, ७७/७९, जन्मभूमी मार्ग, फोर्ट,मुंबई ४०० ००१.

१२) ज्येष्ठ विधीतज्ञ ॲड.श्री.गुरुकृष्णकुमार,सी-१/२५,सफदरजंग डेव्हलपमेंट एरीया, न्यू दिल्ली ११० ०१६

१३) निवडनस्ती (मावक)